शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत डॉ. मोहन खताळ, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/२४८४ दि. २०/०२/२०१९ यांचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 256
दि. 26 FEB 2019

d:\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१
web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 2484
दि. २०/०२/२०१९

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...**

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४०७/तांशि-४, दि. २२.०२.२०१८
३. शासन निर्णय क्र.जीएडी-मातंस-२०१८/सीआर १३८/एस.१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८, दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८, दि. २३.१०.१८, दि. २८.१०.१८, दि. १.१२.१८, दि. १०.१२.१८, दि. ११.१२.१८, दि. १३.१२.१८, दि. १९.१२.१८, दि. २१.१२.१८, दि. २७.१२.१८, दि. ३१.१२.१८, दि. ४.०१.१९, दि. ९.०१.१९, दि. १०.०१.१९, दि. १४.०१.१९, दि. १६.०१.१९, दि. ०१.०२.१९, दि. ०८.०२.१९, दि. १४.०२.१९ रोजीचे पत्रे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील संचालनालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

१. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २८.०२.२०१९ असून, यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही. तरी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालयांचे प्राचार्य यांचेमार्फत कळविण्यात यावे. महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

२. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत, वारंवार सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज संस्था स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी अशा संस्थांना त्यांचे स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज त्वरीत निकाली काढणेबाबत कळविण्यात यावे.

३. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी विनाआधार या पर्यायाचा वापर करुन, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन आधार क्रमांक अपडेट करुन घ्यावा. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार लिंक बँक खात्यामध्ये देण्यात येणार आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner